<u>अहमदनगर येथे मा. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.२ यांचे न्यायालयात.....</u>

संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१८१/२०२२ निशाणी क्र.

| | | |
|---|---|---|
| १. गुन्हा घडलेली तारीख | - | ११/०६/२०१९ |
| २. गुन्हा दाखल तारीख | - | २०/०२/२०२० |
| ३. फिर्यादीचे नाव | - | महाराष्ट्र सरकार तर्फे व करीता भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन, अहमदनगर |
| ४. आरोपीचे नाव व पत्ता | - | १.किरण रावसाहेब काळे<br>वय २५ वर्षे, कामधंदा -मजुरी<br>रा. टाकळीमियाँ,<br>ता. राहुरी जिल्हा अहमदनगर |
| ५. गुन्ह्याचा तपशील | - | |

तुम्ही दि.११/०६/२०१९ रोजी दुपारी १२.४५ वा. चे सुमारास मौजे टाकळीमियॉ शिवारात, टाकळीमियॉ ते मुसळवाडी जाणारे रोडवर बाळासाहेब भवार यांचे घरासमोर, ता. राहुरी येथे रस्त्यावर तुम्ही तुमचे ताब्यातील वाहन बोलेरो गाडी क्र. एम.एच.१७ ए.ए. १२१८ ही भरधाव वेगात, हयगयीने व रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवून फिर्यादी यांची मोटार सायकल क्र. एम.एच. १२ सी. व्ही. ९८४ यावरील चालक सुधाकर गिरीजा साठे यांच्या मोटरसायकलला पाठीमागुन जोराची धडक देवून त्याचे पाठीमागे बसलेला दिपक हिरामण सगळगीळे यांचे गंभीर दुखापत केली किंवा कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोहचेल असा गुन्हा केलात आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिताचे कलम २७९ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी वरील नमुद वाहन तुम्ही बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवून दिपक हिरामण सगळगीळे यांचे मृत्यूस कारण होईल अशी हयगयीची कृती केली आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिताचे कलम **३०४-अ** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी तुम्ही मानवी जीवीत किंवा इतरांचे व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने वरील वाहन चालवून दिपक हिरामण सगळगीळे यांना दुखापत केलात आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिताचे कलम **३३७** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी तुम्ही मानवी जीवीत किंवा इतरांचे व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने वरील वाहन

चालवून दिपक हिरामण सगळगीळे यांना जबर दुखापत केलात आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिताचे कलम **३३८** खाली शिक्षपात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही खटल्याच्या परिस्थितीनुरूप नमुद वाहन वेगाने किंवा धोकादायकपणे चालविला आणि त्याद्वारे तुम्ही मोटार वाहन कायद्याचे कलम **१८४** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही अपघात करुन अपघातातील जखमीस वैद्यकीय मदत पुरविली नाही किंवा अपघाताबाबत जवळचे पोलीस ठाणेत माहिती दिली नाही म्हणुन तुम्ही मोटार वाहन कायदा कलम **१३४(अ)(ब)** प्रमाणे शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दाखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

PANKAJ HILAL PATIL

Digitally signed by PANKAJ HILAL PATIL
Date: 2025.07.15 16:37:21 +0530

दिनांक १५/०७/२०२५
अहमदनगर

(पी. एच. पाटील)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, अहमदनगर